# शिवकालीन प्रशासन



सपांदक
डॉ.मुक्ता गोविंदराव सोमवंशी
डॉ.अशोक काकासाहेब जाधव
डॉ.बळीराम रेश्माजी शिंदे

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Sonpeth Dist.Parbhani

# शिवकालीन प्रशासन

■ प्रथम आवृत्ती – १९, फेब्रुवारी २२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

**ISBN** -978-93-91305-87-1

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

**PRINCIPAL**
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. P...

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq.Sonpeth Dist.Parbhani

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | छत्रपती शिवाजी महाराजांचे युध्द नेतृत्व | प्रा. डॉ. डी. के. खोकले | 1 |
| 2 | शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था आणि अष्टप्रधान मंडळ | डॉ. सुधाकर नारायण भालेराव | 7 |
| 3 | शिवकालीन लष्करी व्यवस्था | श्वेता वैजनाथ आदोडे | 14 |
| 4 | शिवरायांचा महिला विषयक दृष्टीकोण | डॉ. अल्का बाबाराव सोमवंशी | 20 |
| 5 | छत्रपती शिवाजी महाराजांचे गड- किल्ल्यावरील लव्यवस्थापन. | प्रा.डॉ. बालासाहेब शिवाजी पवार | 28 |
| 6 | शिवकालीन जलव्यवस्थापन | प्रा. सोनार मनुजा भास्कर | 33 |
| 7 | छत्रपती शिवरायांच्या मनातील स्त्री विषयक आदर | डॉ. रजनी अ. बोरोळे | 38 |
| 8 | छत्रपती शिवाजी महाराजांचे महसूल प्रशासन | प्रा.डॉ. अमोल काळे | 46 |
| 9 | शिवकालीन अष्टप्रधानमंडळ | मुक्ता सोमवंशी (गंगणे) | 58 |
| 10 | छत्रपती शिवाजी महाराज यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन | सहा प्रा.डॉ. माधव नरहरी कांबळे | 67 |
| 11 | शिवरायाची युध्दनिती | डॉ. डी. एम. कदम | 72 |

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



# शिवकालीन अष्टप्रधानमंडळ

डॉ.मुक्ता सोमवंशी ( गंगणे )
सहयोगी प्राध्यापक तथा लोकप्रशासन विभाग प्रमुख कै. रमेश वरपूडकर
महाविद्यालय सोनपेठ जिल्हा परभणी

छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, उत्कृष्ट प्रशासक आणि असामान्य पराक्रम गाजविणारे नेतृत्व म्हणून जगात सर्वत्र परिचित आहेत. त्यांनी प्रशासन व्यवस्थेत विविध जनकल्याणाची कामे करताना सामान्यातील सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून प्रशासनाची व्यवस्था निर्माण केली. राज्याचा कारभार अधिकाधिक कार्यक्षम व पारदर्शक बनविण्याच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. एक आदर्श प्रशासन यंत्रणा निर्माण करणारे आदर्श प्रशासक, स्वराज्यातून सुराज्य निर्माण करणारे 'सुराज्यकर्ते',सर्वप्रथम लोकशाही तत्वाला अनुसरून प्रशासन यंत्रणा उभारणारे 'लोकोत्तर राजे'. आजच्या लोक कल्याणकारी राज्याचे 'आरंभकर्ता', 'जाणता राजा' म्हणून संपूर्ण जगाला छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांचे घराणे राजघराण्याशी संबंधित होते. त्यांचे माता-पिता जिजाऊ व शहाजीराजे भोसले दोघेही अत्यंत बुद्धिमान, हुशार व सर्वसामान्य माणसांच्या भावनांचा विचार करणारे व अन्यायाचा प्रतिकार करणारे असल्यामुळे महाराजांना बालवयातच अनेक समाज कल्याणाचे संस्कार मिळाले. त्यांचे पिता शहाजीराजे भोसले निजामशाही व आदिलशाहीमध्ये जहागीरदार होते. आदिलशहाने त्यांना मानाचे स्थान दिले होते. असे असतानाही शहाजीराजांनी शिवबाला स्वराज्य निर्माण करण्याच्या दृष्टीने घडविण्यासाठी त्यांना सर्व प्रकारचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली. त्यांच्या मातोश्री जिजाऊ यासुद्धा सर्वगुणसंपन्न होत्या. त्यामुळे त्यांनी बाल शिवबावर असे काही संस्कार केले की, बालवयापासूनच त्यांच्या मनात स्वराज्याची ज्योत पेटली व



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



त्यांच्या अवघ्या सोळाव्या वर्षी म्हणजेच १६४५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेऊन, सर्वप्रथम तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. जागतिक स्तरावरील एक आदर्श राजा महाराष्ट्राच्या भूमीत घडला.

शिवकालीन अष्टप्रधानमंडळ

शहाजी राजांनी आपल्या पत्नी जिजाबाई साहेब व पुत्र शिवाजी राजे यांना बंगलोरहून पुणे जहागिरीवर पाठवत असताना आपल्या जवळील काही अनुभवी, विश्वासू, हुशार, कर्तबगार व मुत्सद्दी असलेल्या सहकाऱ्यांना सोबत पाठविले. त्यामध्ये पेशवा म्हणून श्यामराज नीलकंठ राजेकर, सरनौबत म्हणून माणकोजी दहातोंडे, मुजुमदार म्हणून बाळकृष्णपंत हणमंते, डबीर म्हणून सोनू विश्वनाथ आणि सबनीस म्हणून रघुनाथ बल्लाळ अत्रे यांचा समावेश होता. असे एकूण सात अनुभवी लोक जिजाऊ व शिवरायांसोबत पाठविण्यात आले होते. येथेच अष्टप्रधान मंडळाची सुरुवात झाली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकावेळी ६ जून १९७४ मध्ये आपले अधिकृत अष्टप्रधान मंडळ निश्चित केले. अष्ट प्रधानांची फारसी नावे बदलून त्याजागी संस्कृत भाषेतील नावे निश्चित केली.

**१) पंतप्रधान किंवा मुख्य प्रधान:**-छत्रपती शिवाजी महाराजांनी पहिल्या महत्त्वाच्या पंतप्रधान किंवा मुख्य प्रधान पदावर मोरोपंत त्र्यंबक पिंगळे यांची नेमणूक केली. मुख्य प्रधान मंत्र्यांनी शत्रूची बातमी काढून त्याचा पराभव करावा. छत्रपतींनी नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार पाहावा. इतर प्रधानांशी समान बुद्धीने वागावे. द्वेष बुद्धी न करता सर्वांना सांभाळून घेऊन राज्यकारभार करावा. राजहित प्राणाहुन अधीक समजावे. छत्रपती महाराजांकडून मुद्रा होऊन आलेल्या पत्रावर आपली मुद्रा करावी.ही महत्वाची कार्य पंतप्रधानास करावी लागत होती. पंतप्रधानास पगार रोखीने मिळत असे. १५ हजार होन किंवा ५२५०० रुपये एवढा वार्षिक पगार दिला जात असे.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



२) अमात्य:- छत्रपती शिवाजी महाराजांनी या पदावर नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ यांची नेमणूक केली होती. या मंत्र्यास स्वराज्याचे उत्पन्न आणि खर्च म्हणजेच एकूण जमा खर्चावर लक्ष ठेवावे लागत असे. जमा खर्चाचे काम दप्तरदार व फडणवीस यांच्याकडून करून घेणे. ते तपासून छत्रपतींना सादर करणे. फडणीशी, चिटणीशी पत्रावर आपली मुद्रा उमटवणे. लष्कराचे नेतृत्व करून युद्ध करणे. छत्रपतींनी नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार पाहणे. इत्यादी कार्य अमात्यास करावी लागत असत. अमात्यास १२००० होन किंवा ४२ हजार रुपये एवढा वार्षिक पगार दिला जात असे. आजच्या वित्त मंत्र्याचे काम अमात्यास करावे लागत असे.

**३) सेनापती सरनौबत**:- छत्रपती शिवाजी महाराजांनी सरसेनापती हे पद निर्माण करून त्यास अष्टप्रधान मंडळात स्थान दिले होते. सरसेनापती यांचे कार्य सेनेचे अधिपत्य स्वीकारून युद्ध करणे. सर्व सेनेचे नेतृत्व करणे. सैनिकांचा पगार वेळेवर होतो की नाही ते पाहणे. पराक्रम गाजविणाऱ्या सैनिकांबद्दल छत्रपतींना सांगून त्यांचा गौरव करणे व बक्षीस देणे. नव्याने जिंकलेल्या प्रदेशाचे रक्षण करणे. युद्धातील लुटीचा सर्व हिशोब देणे. सैन्याच्या अडचणी छत्रपतींना सांगून त्या सोडविणे. ही सैनिकाविषयीची व संरक्षणाविषयीची सर्व कामे सरसेनापती किंवा सरनौबत यांना करावे लागत असे. सरसेनापती यांना १० हजार होन किंवा ३५ हजार रुपये पगार दिला जात असे.

**४) सचिव** :- छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या अष्टप्रधान मंडळातील चौथा मंत्री म्हणून सचिवाची नेमणूक केली होती. अण्णाजी दत्तो हे छत्रपती शिवाजी महाराजांचे सचिव होते. या सचिवास छत्रपतींचा सर्व पत्रव्यवहार पाहणे. मजकुरातील अधिक-उणे अक्षर तपासून तो मजकूर शुद्ध करणे. राजपत्रावर संमत असे लिहिणे. महाल, परगणे यांच्या हिशेबाची तपासणी करणे. नव्याने जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था पाहणे. तसेच युद्धप्रसंगी सेनेचे नेतृत्व करण्याचे कार्य सोपविण्यात आलेले होते. सचिवास १०हजार होन म्हणजेच ३५ हजार रुपये एवढा वार्षिक पगार दिला जात असे.



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



५) मंत्री:- छत्रपती शिवाजी महाराजांनी दत्ताजी त्रिंबक यांची मंत्री पदी नेमणूक केली होती. राज्याच्या राजकीय व राजनैतिक बाबी सांभाळण्यासाठी तसेच राज्याच्या दरबारात आलेल्या पाहुण्यांचे स्वागत स्वागत करणे. छत्रपतींची दिनचर्या लिहिणे. त्यांनी केलेल्या कार्याची नोंद करणे. छत्रपतींच्या भोजनातील पदार्थांची तपासणी करणे, त्यासाठी दक्ष असणे. राजपत्रावर संमत असे चिन्ह करणे. छत्रपतींनी नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार पाहणे, प्रसंगी सैन्याचे नेतृत्व करण्याचे कार्य मंत्र्यास करावे लागत असे.मंत्र्यास १० हजार होन पगार दिला जात असे.

६) पंडितराव :- रघुनाथपंत यांची पंडितराव या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. पंडित यांना सर्व धार्मिक बाबींवर अधिकार चालविणे, पंडीत विद्वान ब्राह्मणांचा सन्मान करणे, समोर आलेल्या खटल्यात धर्म अधर्म पाहून अपराध्याला शिक्षा करणे. समाजातील परंपरा आचार-विचार प्रायश्चित्त यासंबंधीच्या राजपत्रावर संमत दर्शक मुद्रा करणे. यज्ञ, शांती, अनुष्ठान यासारख्या धार्मिक बाबी करणे, आवश्यक असेल तेव्हा त्या छत्रपतींना सुचवून त्यांच्या मान्यतेनंतर त्या यथासांग पार पाडण्याचे कार्य करावे लागत असे.यांनाही १० हजार होन एवढा पगार दिला जात असे.

७) सुमंत:- सुमंत या पदावर छत्रपती शिवाजी महाराजांनी रामचंद्र त्रिंबक यांची नेमणूक केली होती. 'सुमंत' म्हणजे परराष्ट्र व्यवहार मंत्री होय. परराष्ट्र व्यवहार पाहणे, परराज्यातील राजकारणावर लक्ष ठेवणे, राज्याच्या दरबारातील वकिलांचे स्वागत करुन त्यांची बडदास्त राखणे, परराज्यातील राजकारणी छत्रपतींना निवेदन करावीत व त्यांच्या आज्ञेने पुढील राजकीय डावपेच आखावेत, राजपत्रावर संमत चिन्ह करावे शिवाय युद्धप्रसंगी सैन्याचे नेतृत्व करण्याचे कार्य सुमंत यांना करावे लागत असे.यांचा वार्षिक पगार १० हजार होन एवढा होता.

८) न्यायाधीश:- छत्रपती शिवाजी महाराजांनी रावजी यांची न्यायाधीश पदावर नेमणूक केली होती. न्यायाधीशास राज्यातील सर्व खटल्यांचे कामकाज पहावे लागत असे. खटल्याची बाजू ऐकून घेऊन योग्य ते न्यायदान करणे. न्याय-निवाडा पत्रावर समत असे चिन्ह उमटवणे. छत्रपतींच्या चारित्र्याला दोष न लागेल असे नि:पक्षपाती

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



न्यायदान करण्याचे काम करावे लागत असे. तसेच ब्रह्म सभेकडून होणाऱ्या न्यायदानावर लक्ष ठेवण्याचे कार्य ही न्यायाधीशास करावे लागत असे.

अष्टप्रधान मंडळ रचना व कार्यपद्धती

**१) पद पात्रतेनुसार:-** अष्टप्रधान मंडळातील सदस्यत्व संबंधित व्यक्तीची कर्तबगारी,बुद्धिमत्ता,पराक्रम आणि निष्ठा या आधारावर दिले जात असे ते वंशपरंपरागत पद्धतीने कधीही देण्यात येत नव्हते.त्यामुळे सचोटी, कर्तबगारी व निष्ठा असेल तोपर्यंतच ते पदावर राहू शकतात.याची कल्पना अष्टप्रधान मनातील सदस्यांना असल्याने तेही छत्रपतींच्या नजरेतून आपण उतरणार नाही याची दक्षता घेत. स्वराज्य सेवा पार पडत असताना सेनापती प्रतापराव गुजर यांनी स्वराज्यासाठी वीरमरण स्वीकारल्यानंतर त्यांच्या पुत्राला त्यांचे पद न देता हंबीरराव मोहिते यांना देण्यात आले.

**२) अकार्यक्षम प्रधानांची बडतर्फी :-** छत्रपती शिवाजी महाराज निष्ठा, पराक्रम व सचोटी या गुणांचे भोक्ते होते. त्यामुळे एखाद्या सदस्याची अपात्रता सिद्ध झाल्यास त्याची बडतर्फी केली जात असे. त्यांनी सुरुवातीच्या काळातच तुकोजी चोर व माणकोजी दहातोंडे यांना अल्पकाळातच पदावरून बडतर्फ केले. थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात कार्यक्षम सदस्यांना बडतर्फ केले जात असे. ज्या व्यक्ती प्रामाणिक निष्ठेने व कार्यक्षमपणे कार्य करत होत्या त्या व्यक्ती आपल्या पदावर दीर्घकाळ राहिल्या.उदा.मोरोपंत पिंगळे

**३) प्रधानाकडे लष्करी जबाबदारी :-** छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या अष्टप्रधान मंडळांमध्ये सेनापती हे पद निर्माण केले होते. तरीही पाच प्रधानांना छत्रपतींच्या आज्ञेनुसार लष्करी मोहीमेवर जाऊन लष्कराचे नेतृत्व करावे लागत असे. याशिवाय प्रधानाकडे नियमित कामा शिवाय छत्रपतींकडून अतिरिक्त कामगिरीही सोपविली जात असे व प्रसंगी वकील म्हणूनही प्रधानांना जवाबदारी दिली जात असे.

**४) प्रधानाकडे प्रादेशिक कारभार सोपविण्याची पद्धत :-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थेत प्रधान मंडळातील सदस्यांकडे एखाद्या प्रदेशाचा कारभार





सोपविण्याची पद्धत रूढ होती. महाराजांनी आपल्या चार सर सुभ्यापैकी तीन सर सुभ्यावर प्रधानापैकी मोरोपंत त्र्यंबक, अनाजी दत्तो व दत्ताजी पंत वाकेनिवीस यांची नेमणूक केली होती. तर चौथ्या सर सुभ्यावर अष्टप्रधान मंडळात नसलेल्या हरजी महाडिक यांची सुभेदार म्हणून नेमणूक केली होती

**५)प्रधानांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांची निवड महाराजांकडून:-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या अंगी उत्कृष्ट प्रशासकाचे सर्व गुण होते. परिणामी प्रधानांच्या कचेरीतील अधिकाऱ्यांची निवड महाराज स्वतः करीत असत.प्रधान यांच्या अनुपस्थितीत विशेषतः लष्करी मोहिमेच्या काळात हे अधिकारी दरबारी कामकाज पहात असत.

**६) अष्टप्रधान मंडळाची बदलती संख्या:-** अष्टप्रधानमंडळात आठ सदस्य जरी असले तरी त्यातील संख्या ही कायमस्वरूपी होती असे नाही.राज्याभिषेकावेळी अमात्य या एकाच पदावर नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ या दोन बंधूंची नेमणूक केलेली होती. पुढील काळात ती काही वेळा आठ पेक्षा कमी असल्याचेही दिसून येते.

**७) वेतनधारी पद्धत :-** छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही प्रधानाला त्यांच्या सेवेच्या बदल्यात जहागिरी दिली नाही किंवा वतनदारी दिली नाही. कारण वतनदारी पद्धतीचे परिणाम हे छत्रपती शिवाजी महाराजांनी अनुभवले होते. म्हणून त्यांनी सर्वांना रोख स्वरूपात पगार देण्याची प्रथा सुरू केली. हा पगार प्रधानांना वार्षिक स्वरूपात दिला जात असे.प्रधानांना दिला जाणारा पगार हा त्यांच्या पदाला शोभणारा असा होता. यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसू शकला.

**८) प्रधान मंडळात ब्राह्मण समाजाचे वर्चस्व:-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळांमध्ये सात ब्राह्मण प्रधान पदावर नियुक्त करण्यात आले होते तर एक प्रधान हा मराठा समाजातील सेनापती पदावर नियुक्त करण्यात येत असे. कारण मराठा जातीतील क्षत्रिय या पदाची जबाबदारी मोठ्या आनंदाने व अभिमानाने पेलत असत शिवाय तत्कालीन समाजव्यवस्थेत ब्राह्मण समाज ज्ञानी झाला होता आणि प्रशासन चालविण्यासाठी हुशार बुद्धिमान व पात्र व्यक्तींना नेमणुका देणे आवश्यक होते. यामुळे राज्यकारभार चालविण्यासाठी विद्वान

व्यक्तींच्या नेमणुका होणे आवश्यक होते. म्हणून अष्टप्रधान मंडळातील सदस्य हे ब्राह्मण समाजातील घ्यावे लागले.

**कार्यपद्धती**

**स्वराज्याचे सर्वोच्च अधिकारी**

अष्टप्रधान यांना त्यांच्या नेमणुकी नुसार जबाबदारी व अधिकार दिले असले तरी अंतिम व सर्वोच्च अधिकार हे महाराजांच्या हाती होते. प्रभावी राज्य व्यवस्थेसाठी किंवा आणीबाणीच्या प्रसंगी अष्टप्रधानमंडळाने महाराजांना सल्ला द्यावा अशी प्रथा होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अष्टप्रधानमंडळाने दिलेला सल्ला मानण्याचे बंधन महाराजांवर नव्हते. अशा सल्ल्याच्या विरुद्ध बाजूचा निर्णय जर महाराजांनी घेतला तर तो मान्य करून तशी कार्यवाही करण्याचे बंधन अष्टप्रधान मंडळावर आणि त्यांच्या सर्व अधिकाऱ्यांवर सेवकांवर होते. उदा. अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी अष्टप्रधानमंडळाने खानाशी तडजोड करण्याचा सल्ला महाराजांना दिला होता, परंतु हा सल्ला महाराजांनी फेटाळून लावून लढण्याची तयारी केली व महाराजांच्या या निर्णयात सर्वांनी मनापासून साथ दिली.

**संयुक्त जबाबदारीचे तत्व**

राज्यातील महत्त्वाचे निर्णय व कागदपत्रांवर प्रधान मंडळातील मुख्य प्रधान ,आमात्य, सचिव ,मंत्री ,सुमंत यांच्या मुद्रा घेतल्या जात असत. मुद्रा होणे म्हणजे संबंधित प्रधानाची सही होणे होय. महाराजांनी ही पद्धत जाणीवपूर्वक सुरू केली .महत्त्वाचा निर्णय घेत असताना काही चूक होऊ नये आणि त्रुटी राहू नयेत या उद्देशाने सर्वांच्या सह्या घेण्याची प्रथा महाराजांनी पाडली. महत्त्वाचे निर्णय सर्वांच्या नजरेखालून जावेत. प्रधान मंडळात राज्यकारभाराचे गांभीर्य व जाणीव वाढावी. कारभार अधिक कार्यक्षम व पारदर्शी स्वरुपात व्हावा. या उद्देशाने महाराजांनी संयुक्त जबावदारीचे तत्व आपल्या प्रशासनात अंगीकारले होते.

**प्रधानांचे कार्यालय व अधिकारी**

प्रत्येक प्रधानाचे स्वतंत्र कार्यालय होते. त्यामार्फत ते आपला कारभार चालवीत असत. प्रधानांच्या हाताखालील सर्व अधिकाऱ्यांची निवड महाराजांकडून





केली जात असे. मात्र नियमित कार्यपद्धतीमध्ये ते खाते प्रमुख म्हणजेच संबंधित प्रधानास जबाबदार असतात. प्रत्येक प्रधानाच्या हाताखाली दिवान, मुजुमदार, फडणीस, सबनीस कारखानीस, चिटणीस,जामदार, पोतनीस अधिकारी कार्यरत होते.

**चिटणीस व इतर अधिकारी**

शिवकाळात चिटणीस हे पद अत्यंत महत्त्वाचे होते. कारण छत्रपतींचा खास पत्रव्यवहार व राजनैतिक पत्रव्यवहार लिहिण्याचे काम चिटणीसाकडे होते. खास आणि विश्वासातील व्यक्तीलाच या पदावर नेमले जात असे. बाळाजी आवजी प्रभू हा महाराजांच्या काळात त्यांचा चिटणीस होता. राजदरबारात त्यांना इतर प्रधाना एवढाच मान दिला जात असे.

**छत्रपतींचे सर्वोच्च स्थान**

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी अष्टप्रधानमंडळ व त्यांची कार्यालय अधिकारी व सेवक वर्ग या प्रशासकीय यंत्रणेला मूर्त स्वरूप प्राप्त करून दिले. त्यानंतरची कर्मचारी अधिकाऱ्यांची साखळी म्हणजे चिटणीस, फडणीस व इतर पत्रलेखक १८ कारखाने व १२ महाल, सर सुभेदार, सुभेदार, पायदळ, घोडदळ व आरमार या तिन्ही दलातील लहान-मोठे सर्व अधिकारी, किल्लेदार अशा सेवक वर्गाची मोठी साखळीच निर्माण केलेली होती. त्या सर्वांची जबाबदारी म्हणजे अधिकार आणि कर्तव्य यांची स्पष्ट कल्पना महाराजांनी संबंधितांना वेळोवेळी दिल्यामुळे व मोठ्या साखळीत समन्वय निर्माण होऊन स्वराज्याचा राज्यकारभार आदर्श बनविण्यात मदत झाली. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या कारकीर्दीत या प्रभावी व आदर्श साखळी च्या कार्यपद्धतीला धक्का बसला नाही. शिवकालीन प्रशासकीय यंत्रणेच्या सर्वोच्च स्थानी छत्रपती असत त्यांच्या मार्गदर्शनाखाली अष्टप्रधान व अष्टप्रधान यांच्या नियंत्रणाखाली इतर अधिकारी म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन यंत्रणेमध्ये अधिकार परंपरा या तत्त्वाचा अवलंब केल्याचे स्पष्ट होते.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist.Parbhani

**संदर्भ ग्रंथ**


१) प्राचार्य डॉ.इस्माईल पठाण-छत्रपती शिवाजी महाराज,महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी कोल्हापूर, १९ फेब्रुवारी २०२१

२) प्रा.डॉ. सोमनाथ शंकर रोडे-मराठ्यांचा इतिहास, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर,२०००

३) डॉ.साहेबराव गाठाळ-मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जुलै १९९८

४) प्रा.पी.जी.जोशी-मराठ्यांचा इतिहास, अभय प्रकाशन, नांदेड , जून १९९८


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani